# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28 / 06 / 2023 (बुधवार) सकाळ

## अधिसूचना

### मौजा धापेवाडा येथील श्री विठ्ठल रुख्मणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्त दिनांक २९/०६/२०२३ व दि. ०४/०७/२०२३ रोजी यात्रेचे कालावधी मध्ये मंदिराचे परिसरात " नो पार्कीग झोन" घोषित

नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु.) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री विठ्ठल रुख्मणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्त दिनांक २९/०६/२०२३ व दि. ०४/०७/२०२३ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंडया, पालख्यांचे आगमन होत असते.

मौजा धापेवाडा हे श्री विठ्ठल रुख्मणी देवस्थान विर्दर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखले जात असून दर वर्षी मोठया प्रमाणात भाविक दर्शना करिता येतात. मंदिर परीसराचे ठिकाणी भाविक हे आपले स्वत:चे खाजगी २ चाकी , ४ चाकी वाहनाने दर्शनाकरीता येतात. त्यामुळे वाहतूकीची कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांना मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम २(१) तसेच गृह विभाग क्र. एम. व्हि.ए.–०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२, दिनांक १९.०५.१९९० अन्वये व ११५, ११६, ११७ मोटार वाहन कायदा (१९८८ चा नियम ५९) यानुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये त्यांच्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या नागपूर जिल्हा (ग्रामीण) राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील श्री विठ्ठल रुख्मीणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्त दिनांक २९/०६/२०२३ व दि. ०४/०७/२०२३ रोजी यात्रेचे कालावधी मध्ये पुलाखालील मार्गावर दोन्ही बाजुने व मंदिराचे परिसरात " नो पार्कीग झोन" घोषीत केले आहे. याबाबत नागरीकांना आवाहन केले आहे.

सबब वरील प्रमाणे मौजा धापेवाडा येथील श्री. विठ्ठल रुख्मणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्त पुलाखालील मार्गावर दोन्ही बाजुने व मंदिराचे परिसरात " नो पार्कीग झोन" बाबत सदर अधिसूचना दि. २९/०६/२०२३ ते दिनांक ०४/०७/२०२३ रोजी पावेतो अंमलात राहील. सदर अधिसुचना पत्र जा. क्र. १८८ दि. २७/६/२०२३ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर